Annexure- I

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
**Nursing Faculty**
**Information of Subject-wise Intake as per College & University Recognition, Permitted Seat-Matrix Chart Academic Year 2023 - 24...**

**Name of College :** Govt. College of Nursing Dr. S. C GMCH Nanded........

| UG Degree/PG Degree | Intake as per University /Council | Max. Seats Permitted by MUHS as per Teacher: Student Ratio (1:5) |
|---|---|---|
| | Degree | Degree |
| **UG Degree :** B. Sc (Nursing) | 50 | NA |
| P. B. B. Sc (Nursing) | | NA |
| **PG Degree :** M.Sc. (Nursing) | | |
| Medical Surgical Nursing (Fundamental Nursing + Nutrition) | | |
| Community Health Nursing | | |
| Obstetric and Gynecological Nursing | | |
| Child Health Nursing | | |
| Psychiatric Nursing/Mental Health Nursing | | |

**Any Other, Please Specify:**

..........

..........

..........

..........

**Date:** 14/07/2023

GOVT. C.N.D. S.C.G.M.C.H VISHNUPURI NANDED

Balaji

**Dean/ Principal Stamp & Signature**

PRINCIPAL
GOVT. COLLEGE OF NURSING
Dr. S. C. G. M. C. H.
VISHNUPURI NANDED

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालय स्थापन करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमईडी २०२०/प्र.क्र.१०३/२०/शिक्षण-१

९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.

दिनांक: १६ मार्च, २०२१.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विकास मंडळाच्या प्रदेशामध्ये नांदेड जिल्हा आहे. नांदेड शहरात शीख धर्माचे पवित्र स्थान असल्यामुळे तेथे दरवर्षी भाविक तसेच पर्यटकांची प्रचंड गर्दी होत असते. तसेच नांदेड शहर शैक्षणिक व व्यावसायिक दृष्ट्या मराठवाड्यातील एक प्रमुख केंद्र म्हणून विकसीत होत असल्याने जिल्ह्यातील तसेच आजूबाजूच्या भागातील बरेचसे लोक शहरास भेट देतात. परिणामी, येथील आरोग्य व्यवस्थेवर ताण निर्माण होत आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला संलग्न असे परिचर्या महाविद्यालय स्थापन केले असता आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी होण्यास मदत होईल. सद्यस्थितीत महाराष्ट्रात एकूण ११६ परिचर्या महाविद्यालये आहेत. त्यापैकी ४ राज्य शासकीय परिचर्या महाविद्यालये, २ केंद्र शासनाची परिचर्या महाविद्यालये असून ११० खाजगी परिचर्या महाविद्यालये आहेत.

२. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व आरोग्य सेवेतील परिचारिकांची आवश्यकता लक्षात घेऊन, डॉ शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालय स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, त्यास दिनांक २८.०२.२०२१ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व आरोग्य सेवेतील परिचारिकांची आवश्यकता लक्षात घेऊन, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड

येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह शासकीय परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालय स्थापन करण्यास याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासकीय परिचर्या महाविद्यालयासाठी भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकांनुसार आवश्यक पदनिर्मिती, यंत्रसामुग्री, फर्निचर, वाहन, पुस्तके व दैनंदिन आवर्ती खर्च इत्यादी यासाठी येणाऱ्या एकूण अंदाजित रुपये १६,०९,१४,४८०/- (अनावर्ती खर्च रुपये ५,२०,००,०००/- व पहिल्या चार वर्षाकरिता आवर्ती खर्च रुपये १०,८९,१४,४८०/-) इतका निधी विवरणपत्र-अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे उपलब्ध करुन त्याप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, चौथ्या वर्षाप्रमाणे आवश्यक आवर्ती खर्चासाठी प्रति वर्षी निधी उपलब्ध करून त्याप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर महाविद्यालयासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र-ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे विविध संवर्गातील पदांची शासन मान्यतेने वेळोवेळी निर्मिती करण्यास आणि पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१७८/१४७५, दिनांक १६.०९.२०२० अन्वये दिलेल्या सहमतीनुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३५७/२०२०/(व्यय-१३), दिनांक ०९.१०.२०२० अन्वये सहमती घेऊन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३१५१७२६४६८६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL

Digitally signed by SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=d32b061d22e577cf43207f6a86cadc4ce1798644845edd3b3fb5ef54c3051c62, postalCode=40000, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=30ec04f686f0e87515c68a42bc5df93...af939ef1a35539184495da3e943c6, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL
Date: 2021.03.16 16:25:08 +05'30'

(डॉ.श्री.पुं.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई

४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
९. सर्व राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार,निर्माण भवन, नवी दिल्ली
१२. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मंत्रालय, मुंबई
१४. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. (५ प्रती)
१५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
१६. संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई
१७. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (पाच प्रती)
१९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ९ वा मजला, न्य एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट-४००००१.
२०. जिल्हाधिकारी, नांदेड
२१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ / २ महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
२२. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड
२३. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, नांदेड
२४. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व परिचर्या महाविद्यालये
२५. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई
२६. सर्व सह सचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. निवडनस्ती (शिक्षण-१)

शासन निर्णय क्रमांकः एमईडी २०२०/प्र.क्र.१०३/२०/शिक्षण १, दि.१६.०३.२०२१ सोबतचे सहपत्र.

विवरणपत्र "अ"

| अ. क्र. | खर्चाचा तपशिल | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतिय वर्ष | चतुर्थ वर्ष | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाविद्यालय इमारत बांधकाम | ० | ० | ० | ० | ० |
| २. | विद्यार्थी वसतीगृह बांधकाम | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | यंत्रसामुग्री | १,००,००,००० | ४०,००,००० | ४०,००,००० | २०,००,००० | २,००,००,००० |
| ४. | साधनसामुग्री/फर्निचर | १,००,००,००० | ४०,००,००० | ४०,००,००० | २०,००,००० | २,००,००,००० |
| ५. | वाहन | ६०,००,००० | ० | ० | ० | ६०,००,००० |
| ६. | पुस्तके | ३०,००,००० | १०,००,००० | १०,००,००० | १०,००,००० | ६०,००,०० |
| | **एकूण अनावर्ती खर्च** | **२,९०,००,०००** | **९०,००,०००** | **९०,००,०००** | **५०,००,०००** | **५,२०,००,०००** |
| ७. | वर्ग-१ ते वर्ग-३ नियमित पदांच्या वेतनावरील अंदाजित खर्च | १,३९,८३,३४८ | २,०२,५०,९८४ | २,३८,५७,१०४ | २,६३,४७,०४४ | ८,४४,३८,४८० |
| ८. | वर्ग-३ व वर्ग-४ ची बाह्यस्रोताद्वारे घ्यावयाच्या पदांवरील अंदाजित खर्च | १९,४४,००० | २९,२८,००० | ३२,१६,००० | ३४,०८,००० | १,१४,९६,००० |
| ९. | दैनंदिन आवर्ती खर्च | ३९,१०,००० | ३४,१०,००० | २७,५५,००० | २९,०५,००० | १,२९,८०,००० |
| | **एकूण आवर्ती खर्च** | **१,९८,३७,३४८** | **२,६५,८८,९८४** | **२,९८,२८,१०४** | **३,२६,६०,०४४** | **१०,८९,१४,४८०** |
| | **आवर्ती + अनावर्ती खर्च** | **४,८८,३७,३४८** | **३,५५,८८,९८४** | **३,८८,२८,१०४** | **३,७६,६०,०४४** | **१६,०९,१४,४८** |

विवरणपत्र "ब"

| संवर्ग | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | चतुर्थ वर्ष | एकूण आवश्यक पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| वर्ग - १ | २ | ० | ० | ० | २ |
| वर्ग - २ | २ | १ | ० | ० | ३ |
| वर्ग - ३ | १७ | ९ | ६ | ४ | ३६ |
| वर्ग-३ (काल्पनिक पदे) बाह्यस्रोत | ५ | १ | ० | ० | ६ |
| वर्ग - ४ (कंत्राटी) | १४ | ९ | ३ | २ | २८ |
| **एकत्रित एकूण** | **४०** | **२०** | **९** | **६** | **७५** |

**डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील शासकीय परिचर्या (बी.एस्सी) महाविद्यालयाकरिता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ५० विद्यार्थी प्रवेशित करण्यास परवानगी देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एमईडी-२०२०/प्र.क्र.१०३/२०/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- २२ फेब्रुवारी, २०२२

**वाचा**:- १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय समक्रमांक, दि.१६.०३.२०२१.
२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.MUHS/PB/UG/Nursing/P-५/१९४/२०२२, दि.१०.०२.२०२२.

**प्रस्तावना:-**

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या (बी.एस्सी) महाविद्यालय सुरु करण्यास संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, संदर्भ क्र. (२)येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने सदर परिचर्या महाविद्यालयास सन २०२१-२२ करिता ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस प्रथम संलग्निकरण प्रदान केले आहे. सबब, सदर महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह परिचर्या (बी.एस्सी) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील शासकीय परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने संदर्भ क्र.२ द्वारे दिलेल्या संलग्निकरणाच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ५० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

डॉ श च शा वै म.व रु.विष्णुपुरी नांदेड
आवक क्र 1522
दिनांक 25/02/2022
Received on 25/02/22 @ 1pm

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

४) सदर महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता राज्य शासनाने निर्धारित केल्यानुसार ५० एवढी राहील.

५) सदर महाविद्यालयामध्ये कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

६) सदर महाविद्यालयामध्ये गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील.

२. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०२२२१२४०४६७३१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRINIVAS
PUNDLIKRAO
KOTWAL

Digitally signed by SHRINIVAS PUNDLIKRAO KOTWAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d32b061d22e577cf43207f6a86cadc4ce1798644845edd3b3fb5ef54c3051c62, pseudonym=FB85CB78D48FD59FDB880E6E036B604B5888852F, serialNumber=30EC04F686F0E87515C68A42BC5DF9353C8AF939EF1A35539184495DA3E943C6, cn=SHRINIVAS PUNDLIKRAO KOTWAL
Date: 2022.02.22 15:37:13 +05'30'

(डॉ. श्रीनिवास पुं. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
९) सर्व राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
१३) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
१४) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
१५) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१६) डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड.
१७) प्राचार्य/अधिष्ठाता, शासकीय परिचर्या महाविद्यालय, नांदेड (डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड)
१८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
१९) जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड.
२०) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय.
२१) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ९ वा मजला, न्य एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट-४०000१.
२२) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी , वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) निवडनस्ती (शिक्षण-१).

## महाराष्ट्र शासन

क्रमांक: एमईडी-२०२०/प्र.क्र.१०३/२०/शिक्षण-१
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
९वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक: १४.०१.२०२२.

तात्काळ

प्रति,
आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,
मुंबई.

**विषय:-** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालय सुरू करणेबाबत.

**संदर्भ:-** आपले पत्र क्र.संवैशिवसं/ डॉ.शचशावैमरूनां/२१-२२/परवाणगी/१-अ, दि.२६.११.२०२१.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने संदर्भाधिन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालय सुरू करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्ताव हा कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी केलेल्या शिफारशीनुसार सादर करण्यात आला आहे. तथापि,मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी शिफारस करणे अपेक्षित नाही.

३. त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकरणी प्रथम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत Consent of Affiliation घ्यावे व त्याआधारावर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालय सुरू करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

डॉ श च शा वै म व रु.विष्णुपुरी नांदेड
आवक क्रं 471
दिनांक 15/01/2022

(सुरेंद्र प्र.चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- संचालक,वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,मुंबई.

15.01.
15.1-22

Scanned by CamScanner

2331
18-1-22

महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. संकेतस्थळ: http://www.med-edu.in & http://www.dmer.org

जा.क्र. संवैशिवसं/शै.वि.-५/बीएस्सीनां/पद भरती/२०२१-२२/२५३ दिनांक : १५/०१/२०२२

**कार्यालयीन आदेश**

विषय : डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालयाकरीता वर्ग-१ ते वर्ग-४ ची मंजूर करण्यात आलेली पदे विहित मार्गाने भरण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र. पदनि २०२१/प्र.क्र.६९/२०२१/परिचर्या, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१

उपरोक्त विषयी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालय सुरु करण्यासाठी वर्ग-१ ते वर्ग-३ ची नियमीत ४१ पदे आणि वर्ग-३ ते वर्ग-४ ची बाह्यस्त्रोताव्दारे भरावयाची ३४ पदे अशी एकूण ७५ पदे चार टप्प्यात निर्माण करण्यास शासनाने संदर्भिय शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेली आहे. संबंधित शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

सबब संदर्भिय शासन निर्णयात नमुद अटी शर्तींच्या अनुषंगाने पद भर्तीची कार्यवाही संबंधित कार्यासनांमार्फत होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

संचालक
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

प्रति,
१) प्रशासकीय अधिकारी, " ब" कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२) प्रशासकीय अधिकारी, " क" कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
३) प्रशासकीय अधिकारी, " ड" कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
४) प्रशासकीय अधिकारी, " ई" कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
५) प्रशासकीय अधिकारी, " आय" कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
६) प्रशासकीय अधिकारी, " फ" कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
७) प्रशासकीय अधिकारी, " ग" कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
८) प्रशासकीय अधिकारी, " के" कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

डॉ श च शा वै म.व रु.विष्णूपुरी नांदेड
आवक क्रं 524
दिनांक 18/01/2022

प्रत,
अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड

18.1.22

**डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालयासाठी आवश्यक पदांची निर्मिती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
शासन निर्णय क्रमांक : पदनि २०२१/प्र.क्र.६९/२०२१/परिचर्या,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार (७ वा मजला),
**लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.**
दिनांक : १६ नोव्हेंबर, २०२१.

**वाचा :-**
१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमईडी-२०२०/ प्र.क्र.१०३/२०/शिक्षण-१, दि.१६.०३.२०२१
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/ बीएससीनकॉनांदेड/नवीन बाब / पदनिर्मिती प्रस्ताव / ७१२६/२०२१, दि.१५.०४.२०२१

**प्रस्तावना :**

नांदेड शहर शैक्षणिक व व्यावसायिक दृष्टया मराठवाड्यातील एक प्रमुख केंद्र म्हणून विकसित होत असल्याने जिल्ह्यातील तसेच आजुबाजूच्या भागातील बरेचसे लोक शहरास भेट देतात. परिणामी तेथील आरोग्य व्यवस्थेवर ताण निर्माण होत आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला संलग्न असे परिचर्या महाविद्यालय स्थापन केले असता आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी होण्यास मदत होईल. ही बाब विचारात घेऊन, तसेच राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व आरोग्य सेवेतील परिचारिकांची आवश्यकता लक्षात घेऊन डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालय स्थापन करण्यास संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरून डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील शासकीय परिचर्या महाविद्यालयासाठी पद निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या परिचर्या महाविद्यालयासाठी **विवरण पत्र अ** नुसार चार वर्षात निर्माण करावयाच्या एकूण ४१ नियमित पदे व बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या एकूण ३४ मनुष्यबळाच्या सेवांना उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक २३.८.२०२१ च्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे.

१. विवरण पत्र "अ" मध्ये नमूद केलेली प्रथम, द्वितीय , तृतीय व चतुर्थ टप्प्यातील पदे टप्पानिहाय मंजूर होणार असून प्रथम वर्षाबाबतची पदे तात्काळ निर्माण होतील व उर्वरित द्वितीय, तृतीय व चतुर्थ टप्प्यातील पदे संबंधित वर्षनिहाय होतील.

२. ज्या पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे करुन घेण्यास मान्यता दिली आहे, त्या पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे करुन घेताना शासन परिपत्रक वित्त विभाग,दि.२७.०९.२०१०, दि.०२.०२.२०१३, दि. ०२.१०.२०१३ व दि.०२.०८.२०१६, दि.३०.०९.२०२० तसेच, याबाबत वेळोवेळी शासनाकडून निर्गमित होणाऱ्या शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

३. सदर पदांच्या वेतनावरील संस्थानिहाय लेखाशिर्ष व आहरण संवितरण सांकेतांक मंजूर करून

घेण्यात यावे.

४. पुढील टप्प्याच्या वेतनाची तरतूद संस्थेच्या प्रतिवर्षाच्या अंदाजपत्रकात करण्यात यावी.

५. पुढील टप्प्यांच्या पदांचा समावेश प्रतीवर्षी अस्थायी पदांच्या मुदतवाढ प्रस्तावात करण्यात यावा.

६. शासकीय परिचर्या (बीएस्सी) महाविद्यालयातील पुढील टप्प्यातील (दुसऱ्या, तिसऱ्या व अंतिम) पदे निर्माण करण्यासाठी उच्चस्तरीय समितीला सादर करण्याचा परिपूर्ण प्रस्ताव संबंधित शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी किमान सहा महिने अगोदर शासनास सादर करण्याची दक्षता आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) व संचालक (वैद्यकीय शिक्षण) यांनी घ्यावी.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक२८५/२०२१/सेवा-९ दि.१५.११.२०२१ व अनौपचारिक संदर्भ क्र.४६०/आपुक, दि.१५.११.२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१११६१२१५२१४९१३ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by
VAISHALI MANISH SULE
Date: 2021.12.20
16:56:39 +05'30'

**( वैशाली सुळे )**
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय,राजभवन, मलबार हिल ,मुंबई
२. मा. सभापती / अध्यक्ष, विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
४. मा.मंत्री (वै.शि.) यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
५. मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१/ नागपूर-२
९.जिल्हाधिकारी, जिल्हा नांदेड
१०. सचिव, (वैद्यकीय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मुंबई
११. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ, नाशिक
१४. सचिव (आ.पु.क.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सहसचिव /उपसचिव (परिचर्या), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, नांदेड
१७. अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नांदेड
१८. प्राचार्या, परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई
१९. अधिक्षिका, सुश्रुषा सेवा (वर्ग-१), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
२०. निवडनस्ती (परिचर्या).

**शासन निर्णय क्रमांक : पदनि २०२१/ प्र.क्र/६९/२१/परिचर्या, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ चे सहपत्र**

**विवरण पत्र - अ**

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | प्रथम वर्ष पद निर्मिती संख्या | व्दितीय वर्ष पद निर्मिती संख्या | तृतीय वर्ष पद निर्मिती संख्या | चतुर्थ वर्ष पद निर्मिती संख्या | एकूण पद निर्मिती संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **गट-अ (वर्ग - १)** | | | | | | | |
| १ | प्राचार्य | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ | ० | ० | ० | १ |
| २ | उप प्राचार्य | S-२० : ५६१००-१७७५०० | १ | ० | ० | ० | १ |
| **गट-ब (वर्ग - २)** | | | | | | | |
| ३ | अधिव्याख्याता | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ | १ | ० | ० | २ |
| ४ | प्रशासकीय अधिकारी | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ | ० | ० | ० | |
| **गट- क (वर्ग - ३)** | | | | | | | |
| ५ | कार्यालयीन अधीक्षक | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ | ० | ० | ० | १ |
| ६ | ट्युटर | S-१५ : ४१८००-१३२३०० | ६ | ४ | ४ | ३ | १७ |
| ७ | चिकित्सालयीन पाठ्यनिर्देशक | S-१५ : ४१८००-१३२३०० | २ | १ | ० | ० | ३ |
| ८ | लेखापाल | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ | ० | ० | ० | १ |
| ९ | वरिष्ठसहाय्यक | S-१३ : ३५४००-११२४०० | १ | १ | ० | ० | २ |
| १० | वरिष्ठ लिपिक | S-०८ : २५५००-८११०० | १ | १ | १ | ० | ३ |
| ११ | कनिष्ठ लिपिक | S-०६ : १९९००-६३२०० | २ | १ | १ | १ | ५ |
| १२ | वॉर्डन | S-१० : २९२००-९२३०० | १ | १ | ० | ० | २ |
| १३ | आहारतज्ञ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ | ० | ० | ० | १ |
| १४ | वस्त्रपाल | S-०६ : १९९००-६३२०० | १ | ० | ० | ० | १ |
| | | **एकूण नियमित पदे** | **२१** | **१०** | **६** | **४** | **४१** |
| **बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाचे मनुष्यबळ** | | | | | | | |
| १५ | ग्रंथपाल | एकत्रित मानधन | १ | ० | ० | ० | १ |
| १६ | लघुलेखक | एकत्रित मानधन | १ | ० | ० | ० | १ |
| १७ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | एकत्रित मानधन | १ | ० | ० | ० | १ |
| १८ | सहाय्यक ग्रंथपाल | एकत्रित मानधन | १ | १ | ० | ० | २ |
| १९ | वाहनचालक | एकत्रित मानधन | १ | ० | ० | ० | १ |
| २० | स्वच्छक | एकत्रित मानधन | १ | १ | ० | ० | २ |
| २१ | सुरक्षारक्षक | एकत्रित मानधन | २ | १ | १ | ० | ४ |
| २२ | परिचर | एकत्रित मानधन | २ | २ | १ | ० | ५ |
| २३ | स्वच्छता सेवक | एकत्रित मानधन | १ | ० | ० | ० | १ |
| २४ | आया | एकत्रित मानधन | २ | १ | १ | १ | ५ |
| २५ | सफाईगार | एकत्रित मानधन | २ | १ | ० | १ | ४ |
| २६ | माळी | एकत्रित मानधन | १ | ० | ० | ० | १ |
| २७ | धोबी | एकत्रित मानधन | १ | ० | ० | ० | १ |
| २८ | वरिष्ठ स्वयंपाकी | एकत्रित मानधन | १ | १ | ० | ० | २ |
| २९ | स्वयंपाकी | एकत्रित मानधन | १ | १ | ० | ० | २ |
| ३० | चौकीदार | एकत्रित मानधन | ० | १ | ० | ० | १ |
| | **बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाचे एकूण मनुष्यबळ** | | **१९** | **१०** | **३** | **२** | **३४** |

**महाराष्ट्र शासन**

**क्र : पदनि २०२१/प्र.क्र.१०६/२१/परिचर्या**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
(७ वा मजला),लो. टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
**दिनांक : २७.०५.२०२२**

**प्रति,**

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण)
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,
मुंबई.

**विषय :-** डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या परिचर्या महाविद्यालयाकरिता पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करणेबाबत.

**महोदय,**

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व आरोग्य सेवेतील परिचारिकांची आवश्यकता लक्षात घेवून डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या (बीएस्सी) महाविद्यालयाकरिता पदनिर्मितीबाबतचा शासन निर्णय दि.१६.११.२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच सदर महाविद्यालयाकरिता दिनांक: १५.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये नवीन लेखाशीर्षही निर्माण करण्यात आलेले आहे. (प्रत संलग्न)

२. डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय परिचर्या महाविद्यालयासाठी भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकानुसार आवश्यक पदनिर्मिती, यंत्रसामुग्री, फर्निचर , वाहन, पुस्तके व दैनंदिन आवर्ती खर्च इत्यादीसाठी येणाऱ्या खर्चाबाबतची तरतूद करावयाची असल्याने येणाऱ्या सदर खर्चाबाबतचा पुरवणी मागणीचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करावा, अशी विनंती आहे.

आपला,

(धि.बा.रामटेके )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:**

१. संचालक , वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई
२. सहसंचालक (दंत व परिचर्या) , वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई
३. निवडनस्ती, परिचर्या कार्यासन

Received on 2/6/22 @ 11 AM.

डॉ शं च शा वै म.व रु. विष्णुपुरी नांदेड
आवक क्र. 4262
दिनांक 02/06/2022

D:\परिचर्या सर्व\Desktop\श्री.घनवट २०२१\CR.६१.२०२१ NOTE & LETTER.docx

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४, Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik- 422 004
Tel: (0253)-2539198,200,268,307 Student Helpline: (0253)-2539111/6659111/100
Web.: www.muhs.ac.in E-mail : academicnursing@muhs.ac.in

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S, M.D. (Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
Registrar

Outward No.: MUHS/UG/ E-6/154136/ 1054 /2023 Date: 09 /06/2023

To,
**The Principal,**
College of Nursing,
Dr. Shankarrao Chavan Govt. Medical College & Hospital,
Vishnupuri, **Nanded-431 606**

**Sub.:** Continuation / Extension of Affiliation for Academic Year 2022-23.
(Issued under provision No. 05 & 13 of University Direction No. 02/2016)

**Ref.:** Academic Council Resolution No. 48/2022, dated 20/09/2022

Sir / Madam,

With reference to above cited subject, I am directed to communicate that as per Academic Council Resolution No. 48/2022 dated 20/09/2022 and as per your proposal of Continuation of Affiliation/Extension of Affiliation, the Academic Council has unanimously resolved to grant Continuation of Affiliation / Extension of Affiliation for Academic Year 2022-2023 as per the provision u/s 68 and 65 (4) of MUHS Act 1998, for the Nursing (Under Graduate) **B. Sc. Nursing** course of your college.

(a) The intake capacity of students shall be **B. Sc. Nursing – 50.**
(b) It is mandatory to obtain the State Government permission as per GR dated 28/02/2018 (as applicable).
(c) Fulfillment of following deficiencies shall be strictly complied within 3 months, without fail.

**(i) Teaching Staff:**

| Year | Prof. cum Principal | | | Prof. cum Vice Principal | | | Professor | | | Reader/Asso. Professor | | | Lecturer | | | Tutor/Clinical Instructor | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| First & Second Year only | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D | R | E | D |
| | 01 | 01 | - | 01 | - | 01 | - | - | - | 01 | - | 01 | 02 | - | 02 | 08 | 08 | - |

Req. : Indicates no. of required teaching staff as per Council norms.
Ext. : Indicates no. of Existing approved teaching staff.
Def. : Indicates no. of deficit teaching staff as per Council norms.

**(ii) Deficiencies for compliance :**
(a) Deficient teaching staff to be appointed and approval shall be taken from the University.
(b) It is mandatory for college to approve advertisement from the Special Cell of MUHS.

**(iii) Other: -** Late submission of Continuation / Extension of Affiliation fees fine of Rs. 1,44,000/- (Rupees One Lakh Forty-Four Thousand only) till April 2023 for the Academic Year 2022-23 pending with College.

**(iv)** The College shall submit Affidavit in the prescribed format as per Academic Council's Resolution No. 229/2013 (format attached).

**In view of above, I am directed to inform you that this is conditional affiliation issued to your college on the basis of Affidavit submitted by Director, Medical Education Research, Mumbai and as such you are requested to comply with the above mentioned deficiencies within the stipulated time without fail and submit compliance report. Compliance report may be verified by the University by re-inspection of your college.**

**Important Note:**

**1) Although the Continuation / Extension of Affiliation is granted to your College for the Academic Year 2022-23. You are not allowed to admit students for First Year Nursing Course without receipt of permission from State Government (as applicable).**

**2) In case of any irregular admissions, University shall not be responsible for any academic or pecuniary loss or damages of the concerned.**

**3) The admission shall be done through the Competent Authorities only.**

**Thanking you.**

08-6-23

**Registrar**

<u>Copy to:-</u>

1. The Competent Authority, Admission Regulating Authority, Mumbai.
2. The Controller of Examinations, M.U.H.S., Nashik.
3. The Dy. Registrar, Eligibility Dept., M.U.H.S., Nashik.
4. The HOD, Computer Dept., M.U.H.S., Nashik.

No 000277

# महाराष्ट्र परिचर्या परिषद
# MAHARASHTRA NURSING COUNCIL

५ वा मजला, बॉम्बे म्युचुअल अँनेक्स, गन्बो पथ,
रेसिडन्सी हॉटेलच्या समोर, डी.एन.रोड, छेद रस्ता, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

G20 भारत 2023 INDIA

आज़ादी का अमृत महोत्सव स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**MNC/G/17(2021-22)/B.Sc.-165/ 8383 /2023** **Date :- 14/06/2023**

**To,**
The Principal,
College of Nursing,
**Dr. Shankarrao Chavan Govt. Medical College & Hospital,**
Vishnupuri, Nanded-431606

Sub :- **Assent for Basic B.Sc.(N) 1st & 2nd batch for the A.Y.2021-22 & 2022-23 with an intake of 50 (fifty) seats.**

Ref. :- **Resolution No. 49 of General Body Meeting dated 28/04/2023.**

**Sir / Madam,**

As per the provision under section 27 of Maharashtra Nurses Act, 1966, Regulation of Nurses Establishment & Preamble of the Act to make better provision in the law regulating registration and training of nurses in the State of Maharashtra. & as per Maharashtra Nursing Council By-Laws no.26 your institute was **assessed on 12/04/2023.**

I am directed by the **Council** to grant **Assent** for B.Sc.(N) **1st & 2nd batch** of your institution for the academic year **2021-22 & 2022-23 with an intake of 50 (fifty)** seats subject to following conditions: -

1. The intake capacity shall be **50.**
2. **This assent is only for the A.Y. 2021-22 & 2022-23 subject to permission from MUHS / Deemed University / State Govt. etc.**
3. This **assent of B.Sc.(N) Programme** will automatically come to an end without notice in case of your failure to comply with the conditions prescribed by affiliating authority.
4. You should pay continuation of validity fees every year & assessment fees of Rs. 25,000/- till one batch passes out and thereafter once in 03 years.
5. **You should pay assessment fee of Rs.25000/- for 3rd batch in A.Y.2023-24 by online.**
6. **Teaching faculties should be appointed as per INC norms.**
7. **All Labs should be maintained as per norms.**
8. **You are advised to visit Council's website frequently for directions/ notification issued by the undersigned from time to time.**

Received
Balaji
30/6/23

उपायुक्त
30-6-23

डॉ. श. च. शा. वे. म. व रु. विष्णुपुरी नांदेड
आवक क्र. 5282
दिनांक 30/06/2023

**I remain,**

**(Archana Badhe-Naware)**
**I/c Registrar**

5th Floor, Bombay Mutual Annex, Gunbow Street, Opp. Residency Hotel, Off. D.N.Road, Fort, Mumbai 400 001.
**Tel.:** Reg : (022) 4918 3319, Gen. : (022) 4918 3321, Exam. : (022) 1918 3313, IT : (022) 4918 3314
www.maharashtranursingcouncil.org **Email :** mncgeneral2015@gmail.com, general@mncouncil.org,
mncouncilreg@gmail.com, registration@mncouncil.org, mnc.itdept@gmail.com

MNC/F/PO/LH/2080/2023 DT.28/02/2023 (2000NOS) / HUMA GRAPHICS

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथील परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालयासाठी आवश्यक पदांची निर्मिती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

शुध्दीपत्रक क्रमांक : पदनि २०२१/प्र.क्र.६९/२०२१/परिचर्या,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार (७ वा मजला),
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १४ मार्च, २०२३.

वाचा :- शासन निर्णय समक्रमांक दिनांक १६.११.२०२१.

शुध्दीपत्रक :-

वाचा येथील संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १६.११.२०२१ मधील खाली नमूद केलेला परिच्छेद १ (६) वगळण्यात येत आहे.

१(६). "शासकीय परिचर्या (बीएस्सी) महाविद्यालयातील पुढील टप्प्यातील (दुसऱ्या, तिसऱ्या व अंतिम) पदे निर्माण करण्यासाठी उच्चस्तरीय समितीला सादर करण्याचा परिपूर्ण प्रस्ताव संबंधित शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी किमान सहा महिने अगोदर शासनास सादर करण्याची दक्षता आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) व संचालक (वैद्यकीय शिक्षण) यांनी घ्यावी."

२. सदर शुध्दीपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौ.८८/आपुक, दिनांक १३.०२.२०२३ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०३१३१७१४३५७०१३ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वैशाली सुळे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय,राजभवन, मलबार हिल ,मुंबई
२. मा. सभापती / अध्यक्ष, विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
४. मा.मंत्री (वै.शि.) यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई

६. मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१/ नागपूर-२
८.जिल्हाधिकारी, जिल्हा नांदेड
९. सचिव, (वैद्यकीय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मुंबई
१०. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ, नाशिक
१३. सचिव (आ.पु.क.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. सहसचिव /उपसचिव (परिचर्या), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, नांदेड
१६. अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नांदेड
१७. प्राचार्या, परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई
१८. अधिक्षिका, सुश्रुषा सेवा (वर्ग-१), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१९. निवडनस्ती (परिचर्या).

# MAHARASHTRA MEDICAL COUNCIL, MUMBAI

**No. MMC /Accre.Cert/MED-0189/2013** **Dated 09/10/2013**

## CERTIFICATE OF ACCREDITATION

This to certify that, **DR. SHANKARAO CHAVAN GOVERNMENT MEDICAL COLLEGE, NANDED**

is accredited by Maharashtra Medical Council for conducting CME Programmes/ Workshops / Seminars / Short Courses / Conferences

**Registrar**
**Maharashtra Medical Council**

This certificate is valid for 5 years from the date of issue. (Subject to yearly review by MMC )